RESEARCH FRONT

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

# शिक्षक उत्तरदायित्वाच्या विकास प्रक्रियेचे आकलन : एक मागोवा

**प्रा. डॉ. सप्रे नीलिमा रविंद्र**
शिक्षणशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर.

**प्रा. शिंदे भागवत आसाराम**
आझाद कॉलेज ऑफ एज्युकेशन,
सातारा.

## प्रास्ताविक

वर्तमान काळातील अपवाद वगळता सर्व शिक्षक शिक्षण महाविद्यालये अत्यंत बिकट परिस्थितीतून वाटचाल करत आहेत. त्यातून त्यांच्यातील गुणवत्तेसंदर्भात अनेक प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहेत. त्यामुळे प्राथमिक स्तरावरील डी.टी.एड. अभ्यासक्रमापासून ते एम.एड. या शिक्षक प्रशिक्षण अभ्यासक्रमाविषयी फारसे चांगले बोलले जात नाही. यातील सगळयाच बाबी ख–या मानून चालणार नाही. परंतु त्यातील काही बाबी मात्र निश्चितच शिक्षक शिक्षणाचा नव्याने विचार करावयास भाग पाडणा–या आहेत. यात ' शिक्षक उत्तरदायित्व' हा भाग केंद्रस्थानी असल्याचे जाणवते. या संदर्भातील काही प्रातिनिधीक निरीक्षणे, संशोधने निष्कर्ष सांगता येतील.

1. व्यावसायिक निष्ठा, जबाबदारीची जाणीव असलेला सक्षम शिक्षक घडविण्यासाठी प्रचलित शिक्षक शिक्षण कार्यक्रम उपयुक्त नाही. (NCTE)
2. प्रचलित शिक्षक शिक्षण कार्यक्रमात विविध प्रकारच्या माहितीचे केवळ मिश्रण समाविष्ट आहे. (NCTE)
3. बहुतेक शिक्षक आपल्या पेशाकडे पैसा मिळवून देणारे साधन म्हणून पाहतात.
   (Ghosh A.K. University News, March 19-25, 2001)
4. उच्च व्यावयायिक बांधिलकी असणा–या अध्यापकाचार्यांचे प्रमाण फक्त 10% आहे तर व्यावसायिक बांधिलकी समाधानकारक नसणा–या अध्यापकाचार्याचे प्रमाण 54% आहे.
   (पंडित, बन्सिबिहारी, मोरे, लता 2009)

शिक्षक शिक्षणातील आजच्या या गंभीर वास्तवाची दखल घेवून प्रस्तुत संशोधनात्मक शोध निबंधातून शिक्षक उत्तरदायित्व विकसनाची प्रक्रिया कशी घडत जाते.? यातील प्रमुख घटक कोणते? यासंबंधीच्या प्रमुख बाबींचे विवेचन प्रस्तुत संशोधनात्मक लेखातून मांडले आहे.

**अ) शिक्षक उत्तरदायित्वाची संकल्पना :** मूळची वाणिज्य व औद्योगिक क्षेत्रातील उत्तरदायित्वाची संकल्पना शिक्षणक्षेत्रात स्विकारताना शिक्षक उत्तरदायित्वाविषयी तज्ज्ञांनी मांडलेल्या काही प्रमुख व्याख्या विचारात घ्याव्या लागतील.

**1. पेज आणि थॉमस**

'' शिक्षक उत्तरदायित्व ही एक अशी प्रणाली आहे की, ज्याद्वारे शिक्षक आणि शाळा प्रणालीने विद्यार्थ्यांच्या संपादन सुधारणेची जबाबदारी घेतली पाहिजे आणि या संदर्भातील शिक्षकांची ही परिणामकारकता बहिस्थ संस्थेला मोजता आली पाहिजे..''

**2. जोशी, रजनी**

''शिक्षक उत्तरदायित्व म्हणजे शिक्षकांना त्यांच्याकडून अपेक्षित असलेल्या 'कार्यांविषयी व भूमिकांविषयी जबाबदार वा उत्तरदायी धरणे होय.''

सारांशाने, शिक्षक उत्तरदायित्व संकल्पनेत शिक्षकांना विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक यशापयशा संदर्भात जबाबदार मानले जाते. ही जबाबदारी ते टाळू शकत नाहीत वा दुस–यावर लादू शकत नाहीत. शिवाय उत्तरदायित्वा संदर्भातील शिक्षकांची ही परिणामकारकता बहिस्थ संस्थेला मोजता देखील आली पाहिजे. अर्थातच ती निरीक्षण व मापनक्षम असली पाहिजे असे सांगितले आहे.

RESEARCH FRONT

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

## ब) शिक्षक उत्तरदायित्वाचे प्रमुख घटक

'' शिक्षक उत्तरदायित्वाच्या संकल्पनेनुसार शिक्षक प्रामुख्याने कोणकोणाप्रती उत्तरदायित्वशील असला पाहिजे? हे आपणास शिक्षक उत्तरदायित्वाच्या प्रमुख घटकातून स्पष्ट होईल.




आकृती 1 शिक्षक उत्तरदायित्वाचे प्रमुख घटक

शिक्षक उत्तरदायित्वाच्या या प्रमुख पाच घटकांतून उत्तरदायित्वशील शिक्षकाच्या यातील प्रत्येक घटकानुरूप असलेल्या भूमिका , कर्तव्ये व जबाबदा–यांचा निर्देश मिळतो. या घटकांना केंद्रस्थानी ठेवून शिक्षक उत्तरदायित्वाच्या विकास प्रक्रियेचे आकलन करून घेणे अधिक औचित्यपूर्ण ठरेल.

## क) शिक्षक उत्तरदायित्व विकासाची प्रक्रिया

शिक्षक उत्तरदायित्व विकासाची प्रक्रिया समजून घेण्यासाठी शिक्षक उत्तरदायित्वाच्या प्रमुख घटकानुरूप संबंधित क्षेत्रातील उत्तरदायित्वशील शिक्षक, मुख्याध्यापक, प्राध्यापक, प्राचार्य, सामाजिक कार्यकर्ते, विचारवंत, डॉक्टर्स, शास्त्रज्ञ, पालक, व्यावसायिक यांच्या मुलाखती घेण्यात आल्या. तसेच शिक्षक उत्तरदायीत्वाशी संबंधीत साहित्याचा अभ्यास करण्यात आला. यातून शिक्षक उत्तरदायित्व विकासाची प्रक्रिया नेमकी कशी घडते? त्यावर कोणकोणते घटक परिणाम करतात? प्रशिक्षण काळातील छात्राध्यापकांमध्ये शिक्षक उत्तरदायित्व कसे रूजवता येईल? त्यासाठी जाणीवपूर्वक प्रशिक्षण कार्यक्रम विकसित करता येतील का? अशा अनेक महत्त्वपूर्ण प्रश्नांची उत्तरे , उत्तरांची दिशा मिळाली. तूर्त आपण शिक्षण उत्तरदायित्व विकसनाच्या प्रक्रियेवर अधिक लक्ष केंद्रित करूया. त्यातून शिक्षक उत्तरदायित्व विकासाच्या प्रमुख अवस्था पुढील प्रमाणे विकसित होताना दिसून आल्या.

**शिक्षक उत्तरदायित्व विकासाच्या अवस्था**

| **I) प्रारंभिक अवस्था** | **II) रूजवणुकीची प्रक्रियात्मक अवस्था** | **III) दृढिकरण व समृध्दिकरणाची अवस्था** |
|---|---|---|
| 1. संस्कारशील वातावरण | 1. स्व–विकासाशी सांगड | 1.स्वकडून सामाजिकतेकडे वाटचाल |
| 2. वाचन–चिंतन | 2. उत्कृष्टतेचा ध्यास | 2. समविचारींशी समन्वय |
| 3. सकारात्मक दृष्टिकोन | 3. नाविन्य व प्रयोगशीलता | 3. यशापयशाचे पुनरावलोकन |
| 4.स्वधर्म, स्वत्वाची ओळख | 4. समस्या, आव्हाने व कृतीकार्यक्रम | 4. सहनशीलता, नम्रता |
| 5.कार्यक्षेत्र निवडीतील हेतुस्पष्टता | 5. सातत्यपूर्ण कार्यमग्नता | 5. आत्मिक समाधान ,कृतज्ञता |

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

## I) प्रारंभिक अवस्था

शिक्षक उत्तरदायित्व विकसनाची ही अवस्था ' उत्तरदायित्व' बीजारोपनाची अवस्था मानता येईल. या अवस्थेतील प्रमुख टप्पे खालीलप्रमाणे—

### 1. संस्कारशील वातावरण

उत्तरदायित्वशील शिक्षकाच्या जडणघडणीत घर, कुटुंब, मित्रपरीवार व शालेय जीवनातील संस्कारशील वातावरण अत्यंत महत्त्वाचे ठरते. या संस्कारशील वातावरणातूनच अशा शिक्षकांच्या अंगी अगदी शालेय जीवनापासूनच उत्तरदायित्वशील कार्यसंस्कृतीचे संस्कार कळत नकळत रूजायला लागतात. यात घरातील आई—वडिल, इतर व्यक्ती, मित्रपरीवार तसेच शालेय जीवनातील ध्येयनिष्ठ व आदर्श मानल्या गेलेल्या शिक्षकांचा प्रभाव खूपच लक्षणीय ठरतो. ज्यांच्या वाटयाला हा भाग अधिक प्रमाणात येतो साहजिकच त्यांच्यातील उत्तरदायित्व विकासाची पायाभरणी ही तितकीच मजबूत झालेली असते.

### 2. वाचन, चिंतन

संस्कारशील वातावरणातूनच अशा उत्तरदायित्वशील शिक्षकावर विद्यार्थी दशेपासून वाचनाचे संस्कार झालेले पाहावयास मिळतात. यातून वाढत्या वयानुसार त्यांच्यातील वाचन व आकलन क्षमता विकसित होत जातात. ज्यातून त्यांना मानवी जीवनातील विविध अवस्था, मानव्याची विविध रूपे तसेच अशा प्रसंगी एक चांगला माणूस म्हणून आपले वर्तन कसे असावे याचे विविधांगी आकलन व्हायला लागते. मानव्य विकासाच्या आकलन प्रक्रियेतून त्यांच्यातील चिंतनशीलता विकसित व्हायला लागते. एखाद्या विशिष्ट बाबीचे बहुविध परिणाम, त्यातून चांगल्याची निवड करणे, तर्क करणे, मूल्यमापन करणे, अचूक निर्णय घेणे अशा वैचारिक क्षमता विकसित व्हायला लागतात.

### 3. सकारात्मक दृष्टिकोण

संस्कारशील वातावरण, त्याला मिळालेली वाचन व चिंतनाची जोड यातून उत्तरदायित्वशीलतेसाठी आवश्यक असलेला सकारात्मक दृष्टिोकोण अशा माणसामध्ये अगदी विद्यार्थी दशेपासूनच रूजायला लागतो. त्याचे खूप चांगले परिणामही त्यांना अनुभवयास मिळतात. यातून ' यशासारखे यशदायी हे यशच असत ' या उक्तीप्रमाणे त्यांचा सकारात्मक दृष्टिकोण वाढायला मदत होते. पुढे हाच सकारात्मक दृष्टिकोण अगदी हलाखीच्या बिकट परिस्थितीतही खंबीरपणे अढळ निश्चयाने आपल्या ध्येयप्राप्तीच्या दिशेने वाटचाल करायला त्यांना मदत करतो.

### 4. स्वधर्म, स्वत्वाची ओळख

स्वधर्म म्हणजे आपल्यातील उपजत गुण, क्षमता वा कल ओळखता येणे होय. काहीजण याला आपला प्रकृती धर्म ओळखता येणे असेही म्हणतात. उत्तरदायित्वशील माणसांना लहानपणापासूनच्या संस्कारातून प्रत्यक्ष अप्रत्यक्षरीत्या आपल्यातील उपजत कलागुण, क्षमता वा कौशल्यांची जाणीव झालेली असते. यातून आपला निसर्गतः कुठल्या गोष्टीकडे ओढा आहे. याचा अचूक वेध घेणे व त्यानुसार पुढील वाटचाल करणे त्यांना सहज शक्य होते. उत्तरदायित्वशील शिक्षक या प्रकृतीधर्मानुरूप आपली वाटचाल निश्चित करतो.

### 5. कार्यक्षेत्र निवडीतील हेतुस्पष्टता

उत्तरदायित्वशील शिक्षक वा इतर उत्तरदायित्वशील माणसे ही आपल्या स्वधर्माला, स्वत्वाला अनुसरून विशिष्ट अशा कार्यक्षेत्राची जाणीवपूर्वक निवड करतात. त्यामुळे उत्तरदायित्वशील माणसे आणि इतर सर्वसामान्य माणसे यांच्या कार्यशैलीत व कार्यप्रभावकारकतेत खूप तफावत असल्याचे दिसून येते. तात्पर्य उत्तरदायित्वाशील शिक्षक हा खूप जाणीवपूर्वक मुद्दामहुन विशिष्ट ध्येये वा मनोभूमिका घेवूनच शिक्षकी पेशाची निवड करत असतो; त्यामुळे ' मागता येईना भीक तर मास्तरकी शिक ' अशी दयनीय अवस्था त्यांच्या वाटयाला कधीही येत नाही.

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

## II) रूजवणूकीची प्रक्रियात्मक अवस्था

शिक्षक उत्तरदायित्वाच्या या अवस्थेत प्रारंभिक अवस्थेतील विशिष्ट ध्येये व मनोभूमिका घेवून आलेल्या शिक्षकात ' उत्तरदायित्वाची भावना, कार्यसंस्कृती ख–या अर्थाने रूजू लागते. म्हणून या अवस्थेला उत्तरदायित्व रूजवणूनक प्रक्रियेची अवस्था म्हणणे अधिक संयुक्तिक ठरेल. या रूजवणूकीतील महत्त्वपूर्ण टप्पे वा पाय–या खालीलप्रमाणे होत.

### 1. स्व–विकासाची गरज म्हणून स्विकार

उत्तरदायित्वशील माणसे जेव्हा जाणीवपूर्वक एखाद्या विशिष्ट ध्येयाची निवड करतात तेव्हा त्या ध्येयपूर्तीसाठीचे उत्तरदायित्व हे केवळ त्या ध्येयापूरते वा कार्यापुरते मर्यादित ठेवत नाहीत.याउलट आपल्या विशिष्ट ध्येयपूर्ततेसाठीच्या उत्तरदायित्वाचा ' स्व' विकासाची आत्यंतिक गरज म्हणून स्विकार करतात. त्यामुळे माझे ध्येय वेगळे नि मी वेगळा , माझे आयुष्य वेगळे असा सोईनुसारचा वेगळेपणा त्यांच्या ठायी दिसत नाही. त्यामुळे शिक्षक म्हणून वा मी जे काही आहे तो म्हणून अशी माणसे आपली कामे आत्यंतिक निष्ठेने करत असतात. आपल्याइतकेच किंबहुना आपल्यापेक्षा जास्त आपल्या कामावर प्रेम करत असतात.

### 2. उत्कृष्टतेचा ध्यास

औद्योगिक क्षेत्रातील व्यक्तीचे उत्तरदायित्व हे ती व्यक्ती करत असलेल्या कामाच्या उत्कृष्टतेवरून ठरवले जाते. या तत्वानुसार एखादी व्यक्ती स्वतःचे काम जितक्या उत्कृष्टतेनिशी करत असेल तितक्या प्रमाणात उत्तरदायित्वशील मानली जाते. यादृष्टिने उत्तरदायित्वशील शिक्षक सातत्याने आपण करत असलेल्या सर्व कामामध्ये उत्कृष्टता साधण्याचा सातत्याने प्रयत्न करत असतो. उत्कृष्टतेच्या अधिकाधिक उच्चतम शिखरापर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करत असतो. त्याचा हा उत्कृष्टतेचा ध्यास त्याला अधिकाधिक उत्तरदायित्वशील बनवत असतो. त्याच्या कामाची गुणवत्ता व परिणामकारकता उत्रोत्तर विकसित करत असतो.

### 3. नाविन्याची ओढ व प्रयोगशीलता

उत्कृष्टतेच्या ध्यासातून उत्तरदायित्वशील शिक्षक अध्ययन, अध्यापन, मूल्यमापन, अभ्यासक्रम निर्मिती ,संशोधन, शालेय उपक्रमांची निवड व आयोजन अशा सर्वच बाबतीत सातत्याने ' नाविन्याच्या शोधात असतो' या नाविन्याच्या ओढीतून त्याच्यातील प्रयोगशीलता वाढायला लागते. या प्रयोगशीलतेला पूर्वश्रम व संस्कारांचे पक्के अधिष्ठान असल्यामुळे प्रयोगाची यशस्विता वाढत जाते. त्यातून अशा शिक्षकांना पारंपारिकतेतून येणा–या जडत्वापासून कंटाळवाण्या तोचतोचपणापासून स्वतःला वाचवता येते.

### 4. समस्या, आव्हाने व कृतिकार्यक्रम

उत्तरदायित्वशील शिक्षकाला वा इतर क्षेत्रातील कोणाही उत्तरदायित्वशील माणसाला आपण करत असलेल्या विशिष्ट कार्यक्षेत्रातील, ध्येयप्राप्तीतील भविष्यात येणा–या समस्या, आव्हाने यांची पूर्ण जाणीव असते. त्यामुळे भविष्यातील आपली वाटचाल या आव्हानात्मक मार्गावरूनच होणार आहे याची त्यांना पूर्ण खात्री असते. त्यामुळे भविष्यातील आपल्या ध्येयप्राप्तीच्या मार्गावरील समस्या व आव्हानांना यशस्वीपणे सामोरे जाण्यासाठीचा कृतिकार्यक्रमही त्यांनी निश्चित केलेला असतो. त्यामुळे इतरांना अगदी आव्हानात्मक , अशक्य वाटणा–या समस्यांवरही ते सहजपणे मात करू शकतात.

### 5. सातत्यपूर्ण कार्यमग्नता

उत्तरदायित्वशील माणसाच्या व्यक्तिमत्वाचा एक प्रमुख विशेष असतो तो असा की अशी माणसे सतत कोणत्या ना कोणत्या कार्यात मग्न असतात. यादृष्टिने उत्तरदायित्वशील शिक्षकही शिक्षक उत्तरदायित्वाच्या प्रमुख घटकांसंदर्भात कोणत्या ना कोणत्या कामात मग्न असतो. ही कार्यमग्नता

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

तात्कालिक वा तात्पुरत्या स्वरूपाची नसते तर त्यात एक कायमस्वरूपी असे सातत्य असते. त्यामुळे असे उत्तरदायित्वशील शिक्षक शिक्षणासंदर्भातील नवनवीन विचारप्रवाह ,समस्या , आव्हाने, संधी या संदर्भाने सतत कार्यमग्न असतात.

## III) दृढिकरण व समृध्दिकरणाची अवस्था

शिक्षक उत्तरदायित्व विकासाच्या या अवस्थेत उत्तरदायित्वाच्या भावनेचे दृढिकरण होते. तसेच उत्तरदायित्वाची भावना अधिकाधिक समृध्द होत जाते. यातील प्रमुख टप्पे खालीलप्रमाणे होत.

### 1. ' स्व' पासून सामाजिकतेकडे वाटचाल

उत्तरदायित्वशील शिक्षकाच्या प्रारंभिक अवस्थेतील शिक्षक उत्तरदायित्वाच्या संदर्भातील ध्येये उदिदष्टे व कृतिकार्यक्रमांना या अवस्थेत सामाजिक संदर्भ प्राप्त व्हायला वागतात. एक प्रकारे हे ' स्व 'चे सामाजिक रूपांतरण असते. त्यामुळे या अवस्थेतील उत्तरदायित्वशील शिक्षकाच्या कार्याची वैयक्तिक परिमाणे वैयक्तिक संदर्भ गळून पडतात व त्यांना सामाजिक विकासाचे संदर्भ प्राप्त होतात. या दृष्टिने अशा शिक्षकाचे सामाजिक उत्तरदायित्व अधिक मोलाचे ठरते. यासंदर्भात ' माझी काटेमुंछरीची शाळा ' हे पुस्तक लिहणारे गो.ना. मुनघाटे गुरूजी खूप मार्गदर्शक ठरतात.तसेच यासंदर्भात डॉ.सुनिलकुमार लवटे यांच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याचा उल्लेख अधिक लक्षणीय ठरतो.

### 2. समविचारी व्यक्ती, संस्थांशी जोडून घेणे

उत्तरदायित्वशील माणसे आपल्या कार्याला अधिक व्यापक व चिरस्थायी रूप देण्यासाठी समविचारी व्यक्ती, कार्यकर्ते वा संस्थांशी स्वतःला जोडून घेतात. त्यांच्याशी समन्वय साधतात. यातून अशा उत्तरदायित्वशील माणसाच्या कार्याला व्यापक स्वरूपाचे सामाजिक परिमाण लाभते.सामाजिक महत्त्व प्राप्त होते. यादृष्टिकोनातून ग.प्र.प्रधान, राम शेवाळकर, प्राचार्य शिवाजीराव भोसले , डॉ. सुनिलकुमार लवटे ,वि.ना.लांडगे, रविंद्र येवले यांचे कार्य लक्षात घेता येईल.

### 3. यशापयशाचे पुनरावलोकन

उत्तरदायित्वशील माणसे प्रत्येक टप्प्यावर आपल्या ध्येयप्राप्तीच्या वाटचालीतील यशापयशाचे सातत्याने पुनरावलोकन करत असतात. त्यातून त्यांना आपल्या कडून घडून गेलेल्या चांगल्या बाबी , राहून गेलेल्या उणिवा यांचा एक मार्गदर्शक असा ताळेबंद मिळतो. यादृष्टिने उत्तरदायित्वशील शिक्षकही सातत्याने आपण करत असलेल्या विविध कामातील यशापयशाचा सातत्याने आढावा घेवून त्यानुरुप स्वतःला अधिकाधिक विकसित करत असतो.

### 4. सहनशीलता व विनयशीलता

उत्तरदायित्वशील माणसाला आपली कामे करत असताना खूप सा—या परिचित , अपरिचित समस्या व आव्हानांचा सामना करावा लागतो. आतल्या व बाहेरच्या शत्रूपक्षांचा सामना करावा लागतो. कितीतरी अंतर्विरोधांना सामोरे जावे लागते. यासाठी त्यांना आपल्या अंगी कमालीची सहनशील वृत्ती बाणवावी लागते. त्यातून त्यांच्यातील विनयशीलाही वाढत जाते. या बाबतीतील उत्तरदायित्वशील माणसाचे इतर सामान्यमाणसापासूनचे वेगळेपण अधिकच लक्षणीय ठरते. या संदर्भात अंधश्रध्दा निर्मुलनाशी संबंधित डॉ. नरेंद्र दाभोलकरांनी महाराष्ट्रात जादूटोणाविरोधी कायदा होण्यासाठी तसेच बुवाबाजी व घातक रूढी परंपरांना विरोध करण्यासाठी उभारलेला विवेकी व समंजस तितकाच निर्धारी लढा अत्यंत उद्‌बोधक ठरतो.

### 5. आत्मिक समाधान व कृतज्ञता

उत्तरदायित्वशील माणसाची सगळयात मोठी कमाई असते ती म्हणजे ते करत असलेल्या कामातून त्यांना मिळणारे अत्युच्च दर्जाचे आत्मिक समाधान. या आत्मिक समाधानातून त्यांच्यातील तात्कालिक लोभ, ईर्षा, हव्यास असे दुर्गुण गळून पडतात व त्यांच्या कार्याला डोळे दिपवून टाकणारी झळाळी प्राप्त होते. या संदर्भाने उत्तरदायित्वशील शिक्षकाला अध्यापनातून, तो करत असलेल्या इतर

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

कामातून उच्च प्रतीचे आत्मिक समाधान लाभते. तीच त्याच्या आयुष्याची इतिकर्तव्यता असते. तसेच अशी माणसे स्वतःविषयी , स्वतःच्या कामात ज्यांनी ज्यांनी मदत केली त्या सर्वांविषयी, समाजाप्रती व निसर्गाप्रती कृतज्ञतेची भावन बाळगून असतात. यासंदर्भात डॉ. व.सी.देशपांडे, डॉ. सुमन करंदीकर, हे.गो. देशपांडे , डॉ. सुनिलकुमार लवटे,शिवाजी राऊत यांचा उल्लेख करणे औचित्यपूर्ण वाटते.

**समारोप**

सारांशाने, शिक्षक उत्तरदायित्व विकासाची किंवा इतर कोणत्याही क्षेत्रातील उत्तरदायित्व विकासाची प्रक्रिया ही बहुआयामी असते. त्यामुळे ती विकसित होत जातानाचा प्रवास हा वैयक्तिकतेकडून शेवटी सामाजिकतेकडे जात असतो. असे असले तरी उत्तरदायित्व विकसनातील संबंधित व्यक्तीची भूमिका हिच निर्विवादपणे अत्यंत मोलाची ठरत असते हेही ठामपणे सांगता येते. यादृष्टिने भावी शिक्षकातील उत्तरदायित्वाचा विकास करण्यासाठी यासंदर्भातील त्यांच्या मनोभूमिकेची पुरेशी व सकस मशागत करणे अधिक महत्त्वाचे ठरेल. हे जर आपण प्रचलित शिक्षक शिक्षण अभ्यासक्रमातून करू शकलो तर यातूनच आपण उत्तरदायित्वाच्या दृष्टिने एक परिपूर्ण शिक्षक घडवू; घडविण्यासाठी पूरक वातावरणनिर्मिती करू शकू. अशी आशा बाळगायला हरकत नाही.

**संदर्भ ग्रंथ**


- आमटे, प्रकाश ( 2009) **प्रकाशवाटा**, पुणे : समकालीन प्रकाशन.
- अवचट, अनिल ( 2010) **मुक्तांगणची गोष्ट,** पुणे : समकालीन प्रकाशन.
- कुलकर्णी, सुहास ( 2006) **खरेखुरे आयडॉल्स, भाग 1** , पुणे : समकालीन प्रकाशन.
- कुलकर्णी, सुहास ( 2010) **खरेखुरे आयडॉल्स, भाग 2** , पुणे : समकालीन प्रकाशन.
- कुलकर्णी, हेरंब ( 2007) **शाळा आहे – शिक्षण नाही,** मुंबई : ग्रंथाली प्रकाशन.
- देशपांडे, वसंत ( 2007) अ**ध्यापकांची बांधीलकी** , पुणे : निराली प्रकाशन.
- दाभोलकर, नरेंद्र ( 2010) **तिमिरातून तेजाकडे**, पुणेः राजहंस प्रकाशन
- माळी, नामदेव ( 2012) **शाळाभेट** , पुणे : साधना प्रकाशन.
- मुनघाटे, गो. ना. ( 2011) **माझी काठेमुंढरीची शाळा** , पुणे : साधना प्रकाशन.
- माडगुळकर, व्यंकटेश (1955) **बनगरवाडी** ,मुंबई : मौज प्रकाशन.
- स्वामी, रंगनाथन ( 2009) **शिक्षकांची भूमिका व जबाबदारी** , नागपूर : रामकृष्ण मठ
- बापट, रवी ( 2011) **पोस्टमॉर्टम,** पुणे : मनोविकास प्रकाशन.
- लवटे, सुनिलकुमार ( 2006) **खाली जमीन वर आकाश** ,पुणे : मेहता प्रकाशन.
- Best,J,W,Khan, J,V.(2006) **Research in Education**, New Delhi : Prentice hall of India Private Ltd.
- Prasad, Hemadri, Prasad, Dharmendra (2005) **Towards Proffesionalisation in**
- **Education,** University News, 43 (18) May 02-08
- Ruth,Levitt, Barbara, Janta, Kava, Wegrich **Accountability of Teachers**, Technical Report, Europe.